**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१५९०/२०२२**

**निशाणी क्रमांक: ८ लगत.**

(CNR MHPU23-003036-2022)

**न्यायनिर्णय**

**(जाहीर दिनांक ०९.०५.२०२५)**

प्रस्तुतचा खटला आरोपी विरुध्द मुंबई दारुबंदी कायदा कलम ६५–ई अन्वये चालविण्यात आला.

०२. **अभियोगपक्षाचे थोडक्यात कथन खालील प्रमाणे –**

वर्दीदार सुनिल जगन्नाथ शिरसाट हे गुन्हे शाखा पिंपरी चिंचवड येथे कार्यरत असताना दि.०२/०९/२०२२ रोजी त्यांना गुप्त बातमी मिळाली आळंदी मरकळ रोडवर हॉटेल दोस्ती मध्ये विनापरवाना देशी विदेशी दारू विक्री होत आहे. त्यांनी त्यादिवशी त्यांच्या सहकारी कर्मचारी व दोन पंचासमवेत सायंकाळी १५.४० वाजता सदर ठिकाणी छापा टाकून एकूण रू.७७७०/– किमतीची देशी विदेशी दारू जप्त केली. त्यांनी जप्त मुदेमालापैकी एक एक बाटली रासायनीक तपासणीसाठी राखून ठेवली. आरोपीला अटक करून त्याचेविरूध्द पोलिस ठाण्यात वर्दी दाखल केली.

**०३.** आरोपीचा भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ३५१ अन्वयेचे निवेदन नि.क्र.१६ कडे नोंदवण्यात आले. आरोपीने त्याच्या विरुध्द आरोप नाकारून खोटी केस केली आहे, असा बचाव घेतला आहे.

**०४.** अभियोगपक्षाने अभिलेखावर आणलेला लेखी व तोंडी पुरावा, तसेच सहा. सरकारी अभियोक्ता व बचावपक्षाच्या विधीज्ञांच्या युक्तीवादावरुन पुढील प्रमाणे मुद्दे न्यायनिर्णयासाठी उपस्थित झाले असून त्यावरील निष्कर्ष मी कारणांसह खाली नमूद करीत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष सिध्द करतो का की, दिनांक ०२/०९/२०२२ रोजी सायंकाळी १५.४० वाजण्याच्या सुमारास हॉटेल दोस्ती, मौजे सोळू ता. खेड जि.पुणे येथे आरोपी बेकायदा, विना परवाना देशी विदेशी दारुच्या बाटल्या स्वतःच्या कब्जात बाळगून तिची विक्री करण्याच्या उद्देशाने मिळून आला आणि त्याद्वारे त्याने मुंबई दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा केला? | **नाही.** |
| २. | अंतिम आदेश काय? | **आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

## का र ण मि मां सा

**०५.** आरोपीविरुध्द ठेवण्यात आलेले आरोप शाबीत करण्यासाठी अभियोगपक्षाने अ.सा.क्र.१.पोलिस हवालदार सुनिल जगन्नाथ शिरसाट, अ.सा.क्र.२ सखाराम तुकाराम बोकेफोडे व अ.सा.क्र.३ हौसेराम पिराजी गाडेकर यांची साक्ष नोंदवली आहे. तसेच अभियोगपक्षाने फिर्याद (नि.क्र.११), जप्ती पंचनामा (नि.क्र.१३) व रासायनीक प्रयोगशाळेकडे पाठविलेले पत्र (नि.क्र.१४) यांवर भिस्त ठेवली आहे.

**मुद्दा क्र.१ बाबत–**

**०६.** याकामी अभियोगपक्षाने तपासलेल्या साक्षीदारांपैकी अ.सा.क्र.१ सुनिल जगन्नाथ शिरसाट हे वर्दीदार असून त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दि.०२/०९/२०२२ रोजी त्यांनी गुप्त बातमी मिळाली होती. त्यांनी दोन पंच व इतर कर्मचा–यांसोबत आळंदी मरकळ रोडवरील हॉटेल दोस्ती येथे छापा टाकला असता तो विनापरवाना देशी विदेशी दारूची विक्री करत असल्याचे दिसून आले. त्यांनी सदर हॉटेलच्या मालकाकडे दारूविक्रीच्या परवान्याबाबत चौकशी केली असता तो त्याच्याकडे नव्हता. आरोपीकडे सदर देशी विदेशी दारूविक्रीचा परवाना नसल्याने त्यांनी सदर बाटल्या पंचासमक्ष जप्त केल्या व बाटली रासायनीक तपासणीसाठी नमुना म्हणून राखून ठेवली. त्यांनी सरकारतर्फे आरोपीविरूध्द फिर्याद दिली. फिर्यादमधील मजकूर व त्यावरील सही मान्य करून त्यांनी नि.क्र.११ कडे सिध्द केली. त्यांच्या उलटतपासात महत्वाचे असे काही आले नाही. त्यांनी

उलटतपासामध्ये छापा टाकला होता त्या हॉटेल दोस्तीचा ग्रामपंचायत उतारा घेतला नव्हता हे मान्य करून इतर सूचक प्रश्न नाकारले.

०७. अ.सा.क्र.२ सखाराम तुकाराम बोकेफोडे हे पंच साक्षीदार असून त्यांनी अभियोगपक्षास सहकार्य केलेले नाही. त्यांनी पंचनाम्यावरील त्यांची सही मान्य करुन मजकुराबाबत माहिती नसल्याचे कथन केले आहे. सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास सहकार्य केले नसल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी न्यायालयाच्या परवानगीने त्यांना उलटतपासा सारखे उत्तरसुचक प्रश्न विचारले. परंतु अभियोगपक्षास उपयुक्त होईल असे काहीही अभिलेखावर आले नाही.

०८. अ.सा.क्र.३ हौसेराम पिराजी गाडेकर हे तपासी अंमलदार असून त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, सदर गुन्हयाचा तपास त्यांच्याकडे देण्यात आला होता. त्यांनी पोलिस उपनिरीक्षक श्री.सिसोदे यांचेकडून घटनास्थळ पंचनामा व इतर कागदपत्रे घेवून दिनांक ०३/०२/२०२२ रोजी साक्षीदारांचे तपासटिपण नोंदविले. दिनांक १९/०९/२०२२ रोजी त्यांनी नमुना म्हणून राखून ठेवलेली एक दारूची बाटली रासायनीक परीक्षणासाठी पत्राने पाठवली. त्यांच्या तपासात आरोपीने बेकायदेशीरपणे दारूविक्री करण्याचे उद्देशाने ती त्याच्याजवळ बाळगली हे निष्पन्न झाल्याने त्याच्याविरूध्द दोषारोपपत्र दाखल केले. त्यांच्या उलटतपासात महत्वाचे असे काही आले नाही.

०९. अभिलेखावर आलेला एकंदर पुराव्याचे अवलोकन करता असे दिसून येते की, प्रस्तुत कामी अभियोगपक्षास केवळ वर्दीदार व तपासी अंमलदार यांनीच सहकार्य केलेले आहे. पंच साक्षीदाराने अभियोगपक्षाच्या समर्थनार्थ साक्ष दिलेली नाही. तथापी पंचनामा निर्वीवादपणे सिध्द झाला असे म्हणता येणार नाही.

१०. केवळ वर्दीदार हे आरोपीच्या ताब्यातून छापा टाकून देशी दारूच्या बाटल्या जप्त केल्या आहेत असे सांगत आहेत. तपासी अंमलदार यांचा पुरावा या ठिकाणी औपचारीक स्वरूपाचा आहे. त्यांनी घटनास्थळी जावून छापा टाकलेला नाही किंवा मुद्देमाल जप्तही केलेला नाही. याठिकाणी वर्दीदार यांच्या पुराव्यास इतर दुस–या कोणत्याही पुराव्याने दुजोरा मिळालेला नाही. वर्दीदार यांचा पुरावा थोडया वेळाकरीता ग्राहय धरला तरी प्रस्तुत खटल्यात रासायनीक पृथ्थकरणाचा अहवाल दाखल नसल्याने जप्त केलेला मुद्देमाल ही दारूच होती याबाबात साशंकता निर्माण होते. त्यामुळे आरोपी विना परवाना बेकायदेशीररित्या देशी दारुच्या बाटल्या विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगून होता ही बाब संशया पलीकडे जावून सिध्द होत नाही. सबब मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करीता</u> –**

११. मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविल्यामुळे आरोपी हा संशयाच्या फायद्यास व पर्यायाने निर्दोष मुक्ततेस पात्र ठरतो. अपील कालावधी संपलेनंतर जप्त देशी विदेशी दारूच्या बाटल्या पुढील कारवाईसाठी किंवा नाश करण्यासाठी राज्य

उत्पादन शुल्क कार्यालयाकडे पाठविणेतबाबत आदेश करणे योग्य होणार आहे. सबब मुद्दा क्र.२ करिता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. आरोपीस मुंबई दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) अन्वये गुन्ह्यास पात्र असलेल्या आरोपातून भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २७८(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. अपील कालावधी संपलेनंतर जप्त देशी विदेशी दारूच्या बाटल्या पुढील कारवाईसाठी किंवा नाश करण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क कार्यालयाकडे नियमानुसार पाठविणेत याव्यात.

३. आरोपीचे जामीन बंधपत्र व जामीन कदबा रद्द करणेत येत आहे.

४. आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४८१ अन्वये रुपये १५०००/- (रुपये पंधरा हजार मात्र) सहा महिन्यांच्या कालावधीकरीता जामीन द्यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित केला.)

SWATI BHASKAR NAIKNAVARE
Digitally signed by SWATI BHASKAR NAIKNAVARE
Date: 2025.05.10 16:30:13 +0530

राजगुरूनगर-खेड
दिनांक : ०९.०५.२०२५

**(स्वाती भा. नाईकनवरे-गरड)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
राजगुरूनगर-खेड, जि. पुणे.